पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग
क्र.मभा।१५।कावि।६६।२०१३
दि.२१।१०।२०१३

विषय – अभिलेख नष्ट करणेबाबत...

परिपत्रक,

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ , महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००७ व महापालिका उपविधी २००३ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे अभिलेख वर्गीकरण जतन होणे आवश्यक आहे तसेच जतन करण्याचा कालावधी संपलेले अभिलेख विहीत पध्दतीने नष्ट करावयाचे आहेत.

अभिलेख अंमलबजावणी अंतर्गत अभिलेख नष्ट करणेकामी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ पुणे यांना अभिलेख रद्दी विक्रीस दि. ११.१०.२०१३ अन्वये मा.आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / शाखा प्रमुख यांना कळविणेत येते की मनपा उपविधी २००३ नुसार नष्ट करावयाचे अभिलेखे सक्षम समितीची मान्यता घेऊन मध्यवर्ती भांडार विभागाचे नेहरुनगर येथील गोडाऊन मध्ये दि. 30/11/2013 पर्यंत जमा करणेत यावे. व त्याची एक प्रत यादीसह मध्यवर्ती भांडार विभागाकडे देणेत यावी. जेणेकरून अभिलेख रद्दी विक्रीची प्रक्रीया लवकरात लवकर पुर्ण करणे सोईचे होईल.

सही/-
सहआयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

भांडार अधिकारी
मध्यवर्ती भांडार विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – १८